महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १२

# महाराजा सयाजीराव आणि रियासतकार सरदेसाई

## दिनेश पाटील




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १२

# महाराजा सयाजीराव
# आणि
# रियासतकार सरदेसाई

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि रियासतकार सरदेसाई
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - ३२
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
प्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.


**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# आणि
# रियासतकार सरदेसाई

महाराजा सयाजीराव यांनी १८८१ ला राज्यकारभार हाती घेतल्यापासून पुढे ५८ वर्षांच्या कारकीर्दीत जे अफाट काम उभे केले त्याला आधुनिक भारताच्या इतिहासात तोड नाही. धर्मसुधारणेपासून ते स्वातंत्र्य चळवळीपर्यंत ब्रिटिश भारतातील सार्वजनिक जीवनातील असे एकही क्षेत्र नव्हते जिथे महाराजांचा वावर नव्हता. महत्त्वाचे म्हणजे हा वावर अत्यंत रचनात्मक आणि प्रागतिकसुद्धा होता. अविश्वसनीय स्वरूपाचे हे यश महाराजांनी स्वत: आंतरराष्ट्रीय विद्याव्यासंग, विश्वपर्यटन, वैयक्तिक आणि राजकीय जीवनात ज्ञानाला सर्वाधिक प्रतिष्ठा देण्याची भूमिका, आपल्या राज्यालाच नव्हे तर राष्ट्राला जगातील प्रगत देशांच्या रांगेत वरच्या स्थानावर प्रस्थापित करण्याचा ध्यास याचा परिपाक होता.

महाराजांच्या ५८ वर्षांच्या कारकीर्दीत तब्बल २८ वर्षे महाराज परदेशात राहून राज्यकारभार करत होते. हे वास्तव विचारात घेतले तर शिवरायांनी गुणी आणि ज्ञानी लोकांची एक फौज उभी करून स्वराज्याचे स्वप्न सुराज्यासह साकारले. शिवरायांप्रमाणे सयाजीरावांनी आपल्या प्रशासनाच्या सर्वच विभागात प्रामाणिक, ज्ञानी, प्रचंड कष्टाळू आणि प्राणाची आहुती देण्याची तयारी असणारे खासेराव जाधव यांच्यासारखे अधिकारी निर्माण केले. प्रसंगी भारताबरोबर जगभरातून विविध क्षेत्रातील अव्वल लोक बडोदा प्रशासनात आणले, त्यांना पूर्ण अधिकार दिले, त्यांचे न आवडणारे सल्ले ऐकले आणि अमलात आणले. त्यामुळेच महाराज परदेशात राहूनसुद्धा या अव्वल दर्जाच्या प्रशासन यंत्रणेच्या जोरावर उत्तम राज्यकारभार करू शकले.

सत्यशोधक धामणस्कर, खासेराव जाधव, वासुदेव लिंगोजी बिर्जे, दामोदर सावळाराम यंदे, नानासाहेब शिंदे, आर. एस. माने-पाटील, योगी अरविंद, एफ.ए.एच. इलियट, रोमेशचंद्र दत्त, मणिभाई देसाई, लक्ष्मण वैद्य, काझी शहाबुद्दीन, जयसिंगराव आंग्रे, पेस्तनजी दोराबजी, अप्पासाहेब मोहिते, टेकचंद, मि. सेडन, सत्यव्रत मुखर्जी, अमेरिकन अर्थतज्ज्ञ व्हाईटनेक, अमेरिकन ग्रंथालय तज्ज्ञ बॉर्डन, कलाभवन उभे करणारे टी. के. गज्जर, ए.जे. विजेरी, बिनोयतोष भट्टाचार्य ही काही उदाहरणे यासंदर्भात सांगता येतील.

## गोविंद सखाराम सरदेसाई ते रियासतकार सरदेसाई

रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई हेसुद्धा वरील प्रभावळीतील एक महत्त्वाचे नाव आहे. गोविंद सखाराम सरदेसाई ते रियासतकार सरदेसाई हा सरदेसाईंचा प्रवास १८८९ ते १९२५ या सरदेसाईंच्या सयाजीरावांच्या ३७ वर्षांच्या सेवेचा परिपाक आहे. हा कालखंड महाराजांच्या वैयक्तिक जीवनाबरोबर बडोद्याच्या सामाजिक जीवनातील क्रांतिकारक कालखंड होता. कारण या कालखंडात आदर्श राज्याचे सयाजीरावांचे स्वप्न संपूर्ण सत्यात उतरले होते. महाराजांचे कौटुंबिक जीवन, विद्या व्यासंग, धर्म सुधारणांसह वेदोक्त प्रकरण, महाराजांच्या सर्व मुलांचे शिक्षण, महाराजांच्या निर्णयाविरुद्ध जाऊन त्यांची कन्या इंदिराराजे यांनी केलेला मराठा-आदिवासी हा क्रांतिकारक विवाह यासारख्या ऐतिहासिक घटनांमध्ये सरदेसाईंची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

सरदेसाईंच्या बडोद्यातील नोकरीची सुरुवात महाराजांचे रीडर म्हणून झाली. महाराजांचे रोजचे टपाल व वर्तमानपत्र पाहून ती त्यांच्या सवडीप्रमाणे वाचून दाखवणे, खाजगी पत्रांची उत्तरे देणे, महाराज पुस्तके वाचत त्यातील कठीण शब्द काढून टिपणे करणे यासाठी दिवसातील दोन-तीन तास सरदेसाईंना महाराजांकडे काम असे. महाराजांचे धोरण असे होते की राजवाड्यातील किंवा संस्थानच्या प्रशासनातील प्रत्येकाने भरपूर काम केले पाहिजे.

## पहिले पुस्तक

त्यातूनच सरदेसाईंच्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्याचा मार्ग सयाजीरावांनी कसा शोधून काढला हे सरदेसाईंच्या शब्दात सांगायचे झाल्यास,"...बाकीचा माझा वेळ रिकामा जातो हे तत्काळ महाराजांच्या नजरेस आले. मॅकिआव्हेलीचे 'प्रिन्स' व सीलीचे 'एक्स्पॅन्शन ऑफ् इंग्लंड' हीं पुस्तके त्यांनी वाचली मराठीत त्या वेळी या नवीन पाश्चात्य विचारांची पुस्तके नव्हती हे जाणून त्यांनी मला त्या पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्याचे काम दिले." सरदेसाईंनी हे काम केले तेव्हा ते या क्षेत्रात पूर्णपणे नवखे होते.

परंतु महाराजांनी दिलेले काम म्हणजे करावेच लागेल अशी परिस्थिती असल्याने पहिल्या वर्षी 'प्रिन्स' चे भाषांतर 'राजधर्म', पुढील दोन वर्षात सीलीच्या 'एक्स्पॅन्शन ऑफ् इंग्लंड'चे 'इंग्लंड देशाचा विस्तार' अशी दोन पुस्तके महाराजांच्या खर्चाने प्रकाशित झाली आणि 'इतिहासकार' सरदेसाईंचा उदय झाला. पुढे महाराजांबरोबर अमेरिकेत गेले असता सीली या मूळ लेखकाला भेटण्याची संधी त्यांना मिळाली. त्यासंदर्भात सरदेसाई म्हणतात, "सीलीचे पुस्तक मी त्या प्रोफेसरांस केंब्रिज येथे स्वत: भेटून नजर केलें. याला मी नशीब म्हणतो." सरदेसाईंच्या जीवनातील सयाजीराव नावाचा 'टर्निंग पॉइंट' किती महत्त्वाचा होता हे या घटनेवरून लक्षात येते. याच कालखंडात सरदेसाईंचे वास्तव्य राजवाड्यात असल्यामुळे महाराजांचे प्रचंड मोठे खासगी

ग्रंथालय सरदेसाईंच्या ताब्यात असल्यासारखे होते. यासंदर्भात सरदेसाई म्हणतात, "हिंदुस्थानच्या इतिहासावरील बहुधा कोणतेही महत्त्वाचे हे पुस्तक माझ्या वाचनातून सुटले नाही.'' सरदेसाईंचा विद्याव्यासंग सयाजीरावांच्या सहवासातच कसा विकसित झाला हे यातून स्पष्ट व्हावे.

## वैचारिक परिवर्तन

सयाजीरावांच्या सेवेत येण्याअगोदरचे सरदेसाई धार्मिक अंधश्रद्धा बाळगणारे होते. परंतु महाराजांच्या या ग्रंथालयातील ग्रंथांच्या वाचनाने त्यांच्यातील विज्ञानवादी अभ्यासक घडला. यासंदर्भात सरदेसाई लिहितात, "अशीं चिकित्सक व बौद्धिक विचारांची पुस्तके वाचल्यावर माझी पूर्वीची धार्मिक अंधश्रद्धा नाहीशी होऊन मी एक प्रकारचा निरीश्वरवादी, विचारास पटेल ते आचरणात आणणारा स्वतंत्र विचारी बनलो. उपास तापास, भजन पूजन, सोवळे ओवळे ही सोंगे सर्व टाकून मी स्वतंत्र विचाराने शास्त्रीय शोधांचे ग्रहण करीत आलो आहे. घरांतही हे सर्व प्रकार मी मुद्दाम चालू केले. पुष्कळ वेळ प्रवासांत आगबोट-आगगाडीत मला काढावा लागल्यामुळे आगाऊ वाचनाची तयारी मी बरोबर ठेवीत असे. आगबोटीवर तर लेखनवाचन हाच मुख्य व्यवसाय. वर आकाश व खाली पाणी, भोजन फराळाची चंगळ, अशा त्या बोटीवरच्या प्रवासांत एकान्त तंद्रीच्या भावनेत इतिहासविषयक पुष्कळसे लेखन मी केलेले आठवते."

## धर्मसुधारणेतील सहभाग

महाराजांच्या सहवासात सरदेसाईंमधील इतिहास लेखक नकळत घडत गेला. त्यासाठी विविध घटना कारणीभूत होत्या. १८९५ च्या दरम्यान वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने धर्मशास्त्रातील सत्य शोधण्याची मोहीम सयाजीरावांनी हाती घेतली होती. सरदेसाईंना या कामी महाराजांनी जबाबदारी दिली ती सुद्धा त्यांच्यातील लेखक घडवण्यास उपयुक्त ठरली. यासंदर्भात सरदेसाई म्हणतात, "महाराजांनी आपल्या धर्मकृत्यांत क्षत्रियांचे विधि वेदोक्त मंत्रांनी करण्याचा परिपाठ घातला; पूर्वींच्या उपाध्ये मंडळींना नोकरीतून कमी करून वेदमंत्रांनी कर्में करणारे नवीन उपाध्ये नेमिले. या कामी महाराजांचे हुकूम बरोबर पाळले जातात की नाही, पूजा, श्रावणी इत्यादी प्रसंगांत जे मंत्र म्हटले जातात ते वेदांतले की बाहेरचे हे तपासण्याचे काम त्यांनी मला सांगितले. त्यासाठीं सर्व सोळा संस्कारांच्या विधींचे मराठी भाषांतर करून छापण्याचे काम मी केले." याच काळात २-३ वर्षे सयाजीरावांना संस्कृत शिकविण्याचे कामसुद्धा सरदेसाईंनी केले.

१८९२ च्या युरोप प्रवासात महाराजांनी तार करून सरदेसाईंना युरोपला बोलावले. विशेष म्हणजे या तारेत महाराजांनी सरदेसाईंना स्पष्ट बजावले होते की, या परदेश प्रवासानंतरच्या प्रायश्चित्ताचा खर्च संस्थानाकडून मिळणार नाही. पहिल्या दोन परदेश प्रवासानंतर महाराजांना प्रायश्चित्तावर बराच खर्च करावा लागला होता. त्याची या सूचनेला पार्श्वभूमी होती. पुढे महाराजांनी आदेश काढून प्रायश्चित्ताची ही पद्धत बंद केली.

## क्रांतिकारक विवाहातील यशस्वी मध्यस्थी

सयाजीरावांच्या कन्या इंदिराराजेंनी स्वतः ठरवून १९१३ मध्ये केलेल्या भारतातील पहिल्या मराठा-आदिवासी विवाहात रियासतकार सरदेसाईंनी बजावलेली भूमिका महत्त्वपूर्ण होती. इंदिराराजेंचे आई-वडील ठरल्याप्रमाणे इंदिराराजेंनी ग्वाल्हेरच्या माधवराव शिंदेंशी विवाह करावा यासाठी कमालीचे आग्रही होते. तर केवळ पुत्रप्राप्तीसाठी दुसरे लग्न करणाऱ्या माधवरावांशी विवाह करण्यास इंदिराराजे इच्छुक नव्हत्या. उलट कूचबिहार या आदिवासी संस्थानच्या महाराजांचे बंधू जितेंद्र नारायण यांच्याशी विवाह करण्याचे इंदिराराजेंनी ठरवले होते. अशा परिस्थितीत सरदेसाईंनी इंदिराराजेंच्या वतीने सयाजीराव महाराज आणि महाराणी चिमणाबाई यांच्याजवळ यशस्वी मध्यस्थी केली होती. 'विवाह ठरला असल्यामुळे इंदिराराजेंनी माधवरावांशीच लग्न केले पाहिजे' असे महाराणींचे मत होते. त्यावेळी मुले आता मोठी झाली असून थोडे त्यांच्या कलाने घेणे आवश्यक असल्याचे रियासतकारांनी चिमणाबाईंना समजाविले. इंदिराराजेंवर जास्त जबरदस्ती केल्यास त्या जीवाचे बरे जास्त करून घेण्याची भीती सरदेसाईंनी व्यक्त केली. याचा महाराणींवर अपेक्षित सकारात्मक परिणाम घडून आला.

तर कोणालाही सयाजीरावांना भेटावयाचे असल्यास आधी सूचना देण्याचा नियम महाराजांनी केला होता. प्रशासकीय सोयीसाठी हा नियम योग्य असला तरी कुटुंबीयांसाठी अतिशय

अडचणीचा होता. इंदिराराजेंना स्वतःच्या विवाहाविषयी वडिलांशी चर्चा करण्यात या नियमाचा अडथळा येत होता. अशा परिस्थितीत स्वतःच्या भावना मांडणारे सविस्तर पत्र वडिलांना लिहिण्याचा सल्ला सरदेसाईंनी इंदिराराजेंना दिला. तसेच इंदिराराजेंनी लिहिलेले पत्र सयाजीरावांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था त्यांनी केली. यामुळे इंदिराराजेंच्या विवाहविषयक भावना सयाजीरावांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. या पत्रानंतरच सयाजीरावांनी इंदिराराजेंच्या इच्छेप्रमाणे त्यांचा विवाह करून देण्याची ग्वाही आपल्या मुलीला दिली. रियासतकारांनी काढलेल्या पत्ररूपी तोडग्याचा हा परिणाम होता.

## रियासतींचा जन्म

सयाजीरावांना इतिहास ग्रंथातील मजकूर वाचून दाखविणे आणि राजपुत्रांना शिकवणे या त्यांच्या मुख्य कामासाठी ते लेखी टिपणे काढीत. याच टिपणांनी पुढे रियासतींना जन्म दिला. त्यातील पहिला खंड 'मुस्लिम रियासत' या नावाने १८९८ मध्ये बडोद्यातून प्रकाशित झाला. यानंतर इतिहास हे त्यांचे जीवन ध्येय झाले. पुढे मराठी रियासत, ब्रिटिश रियासत यांच्या आवृत्या १९३५ पर्यंत निघाल्या. १९२७ मध्ये त्यांनी शिवाजी महाराजांच्या त्रिशत सांवत्सरिक उत्सवाच्या निमित्ताने 'Shivaji Souvenir' हा ग्रंथ संपादित केला. परमानंदांच्या अनुपुराणाचे संपादन सरदेसाईंनी केले. ते 'गायकवाड ओरिएंटल सिरिज' मध्ये प्रकाशित झाले.

थोडक्यात रियासतींचे पहिले ८ खंड हे सरदेसाईंचे प्रमुख काम म्हणून सांगता येईल. ज्यावेळी मराठी इतिहासामध्ये वस्तुनिष्ठ ग्रंथ निर्माण झाले नव्हते अशा काळात मराठीत आपला इतिहास लिहिण्याचे काम महाराजांच्या सहवासामुळे आणि महाराजांनी दिलेल्या जबाबदारीमुळे नकळतपणे सरदेसाईंकडून झाले. यासंदर्भात सरदेसाई म्हणतात, "स. १९०० साली मराठ्यांचा इतिहास किती तुटपुंजा होता आणि आज त्याला भरीव रूप कसे आले आहे हा विचार माझ्या निरनिराळ्या आवृत्त्यांतून नजरेस आला म्हणजे या महनीय कामांत माझाही थोडा बहुत हातभार लागला याबद्दल मला कृतकृत्यता वाटते."

महाराजा सयाजीराव हे कागदपत्रांच्या दस्ताऐवजीकरणाबाबत अत्यंत दक्ष असत. प्रत्येक बाबीची नोंद ठेवणे आणि त्या नोंदींचे कागद पद्धतशीरपणे जपून ठेवणे हे ते अगदी सुरुवातीपासून करत आले. भारतातील इतर कोणत्याही संस्थानिकाच्या कामकाजाचे दस्ताऐवजीकरण सयाजीरावांएवढे काटेकोरपणे नसेल. उदाहरण द्यायचे झाले तर १८८६ ला महाराजांनी त्यांच्या राजवाड्यातील खासगी मंदिरातील वार्षिक धार्मिक विधींची माहिती देणारा 'ऐनेराजमेहेल' हा ग्रंथ छापून घेतला. १८९२ मध्ये राजवाड्यातील धार्मिक विधींच्या खर्चाचे १००० पानांचे तपशीलवार बजेट महाराजांनी छापून घेतले होते. या पार्श्वभूमीवर महाराजांनी आपल्या कारकीर्दीतील आपला पत्रव्यवहार, भाषणे इ. सुद्धा छापून घेतले होते.

## सयाजीरावांच्या चरित्रासाठीच्या साधनांचे संकलन

महाराजांनी नेमलेल्या शेकडो समित्यांचे अहवाल, स्वतःच्या २६ परदेश प्रवासांचे अहवाल, शिष्यवृत्तीवर परदेशी गेलेल्या विद्यार्थ्यांचे अहवाल इ. दस्ताऐवज म्हणजे इतिहासाची प्राथमिक साधनेच आहेत. याच पद्धतीने त्यांच्या कारकीर्दीची परिपूर्ण माहिती देणारे चरित्र त्यांच्या साक्षीनेच प्रकाशित व्हावे ही महाराजांची स्वाभाविक इच्छा होती. यासाठी सरदेसाईंएवढा उत्तम लेखक दुसरा कोण असू शकतो? कारण एकतर सरदेसाईंनी इतिहासलेखनाच्या क्षेत्रात केलेले काम महाराजांसमोर होते. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे अगदी महाराजांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासून सरदेसाई दीर्घकाळ सयाजीरावांच्या सान्निध्यात होते. महाराजांच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या घटनांचे सरदेसाई साक्षीदार होते.

या संदर्भात सरदेसाई लिहितात, “महाराजांना आपले चरित्र संपूर्ण आपल्या देखत प्रसिद्ध व्हावे अशी मोठी हाव होती. मी लेखक व त्यांचा निकटवर्ती सेवक तेव्हा मला त्यांनी तशी सूचना पुष्कळदा केली. मी सांगितले माणसाची खरी योग्यता त्याच्या पश्चात् आजमावली जाते. मी त्यांचा पगारी नोकर, तोंडावर त्यांचे गुणावगुण कसे लिहू शकणार! तथापि चरित्राची सर्व साधने पत्रे, हुकूम, फोटोग्राफ, भाषणे, प्रासंगिक घडामोडी, बनाव हें सर्व साहित्य जमवून एकत्र ठेवणे अवश्य होते. मुलांचे व्यवहार, प्रवास, विवाहादी समारंभ यांचे बनलेले कागद ठिकठिकाणी

अव्यवस्थित होते ते सर्व एकत्र करून नकोत ते फाडून बाकीचे सांभाळून विल्हेवारीने निगेत ठेवणे हे काम महत्त्वाचे होते, ते मी सुचविले, त्यांना पटले आणि लगेच चरित्रसंग्रह नावाची स्वतंत्र शाखा काढून माझी त्यांनी त्याकरिता विशेष नेमणूक केली. हाताखाली दोन कारकून नेमले. स. १९१६ च्या डिसेंबरपासून तीन वर्षे मी या स्वतंत्र कामावर राबलो. (१) महाराजांनी लिहिलेली समस्त खासगी पत्रे जुन्या बारनिशा वगैरेंतून काढून त्यांच्या वीस प्रती छापल्या. (२) महाराजांनीं सर्व भाषणे जमवून ती प्रसिद्ध केली. (३) समस्त राजपुत्रांचे कागद, पत्रे, हिशेब, नेमणुका इत्यादी सर्व जमवून प्रत्येकाचे स्वतंत्र संच व्यवस्थित लावून ठेविले. (४) कौटुंबिक व इतर फोटोग्राफ्स सर्व एकत्र जमवून कालक्रमाने व्यवस्थित केले. दरसालच्या वाढदिवसास असे महाराजांचे व कुटुंब-दरबारांचे फोटोग्राफ्स घेत ते त्यांच्या चरित्राचे एक मोठे साधन बनले. (५) खासगी खात्याचे व राज्याच्या व्यवहारांचे महाराजांनी वेळोवेळी दिलेले हुजूर हुकूम सर्व एकत्र संच जमवून निराळे ठेविले.

याशिवाय महाराजांच्या कारभारांतील मुख्य घडामोडी, त्यांच्या स्वाऱ्या, त्यांचे प्रवास, त्यांनी केलेल्या मुख्य सुधारणा, त्यांचे दरबार व समारंभ, मुलांचे जन्मोत्सव व विवाहादी प्रसंग, खुद्द महाराजांचे दत्तविधान व शिक्षण, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची काम करण्याची पद्धत, त्यांनी बांधलेल्या इमारती अशा अनेक विषयांचे वर्णन करणारे लहान मोठे लेख मी मराठीत

तयार करून त्यांच्याही वीस प्रती छापून ठेवल्या. वीस प्रतीच छापण्याचे कारण या लेखांचा उपयोग पुढील चरित्र-लेखकास व्हावा इतकाच होता. त्यांची पत्रेदेखील सर्वच एकदम प्रसिद्ध करण्याजोगी नव्हती. फक्त जुन्या बारनिशा फाटत चालल्या, त्यातून ही पत्रे वाचून मी एका संग्रहात आणली. सारांश, शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषाचे चरित्र लिहिण्यात ज्या अडचणी आज इतिहासकारास भासतात, तशा सयाजीरावांसंबंधाने पुढे भासू नयेत अशी सर्व सिद्धता मी परिपूर्ण करून ठेविली. हे सर्व काम मी चोख केले ते त्यासही पसंत पडले. त्यावरून त्यांची कल्पना तीव्र बनली की मीच त्यांचे समग्र चरित्र लिहावे. मी स्पष्ट कळविले, मी पगारखाऊ सेवक, चरित्रनायकाचे गुणदोष स्पष्ट सांगण्यास असमर्थ; व्यक्तीच्या पश्चात् चरित्र लिहिले जावे हा शहाण्यांचा रिवाज आहे.”

## महाराजांची नाराजी

१९२५ मध्ये सरदेसाईंनी बडोदा संस्थानची नोकरी सोडून पुण्याला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. याला वरील चरित्रलेखनाची पार्श्वभूमीसुद्धा आहे. कारण सरदेसाईंनी चरित्र लेखनास नकार दिल्यामुळे महाराज त्यांच्यावर नाराज झाले होते. बडोद्यात ३७ वर्षे राहिल्यानंतर सरदेसाईंना नोकरीतून मुक्त व्हावे असे वाटत होते. त्यात या नाराजीने भर घातली. महाराजांना मात्र सरदेसाई हवे होते. कारण महाराजांच्या नातवंडांच्या शिक्षणाची जबाबदारी सरदेसाईंकडे देण्याचा महाराजांचा विचार होता.

महाराजांच्या मनाविरुद्ध सरदेसाई नोकरी सोडून जात असल्यामुळे महाराजांनी त्यांच्या पेन्शनमध्ये ६० टक्के कपात केली. महाराजांचे एकूण धोरण बघता हा अपवाद म्हणावा लागेल. परंतु नातवांच्या भविष्याबाबतच्या काळजीपोटी महाराजांकडून हे अपवादात्मक कृत्य घडले असावे.

पुढे सयाजीरावांचे उत्तराधिकारी आणि नातू प्रतापसिंह महाराज यांच्या राज्यारोहण सोहळ्याला सरदेसाईंना सन्मानाने बडोद्यात बोलावण्यात आले. सरदेसाई प्रतापसिंहांचे शिक्षक होते. प्रतापसिंहांनी सरदेसाईंची सयाजीरावांनी ६० टक्के कपात केलेली पेन्शन पूर्ण स्वरूपात सुरू केली. २ मार्च १९४७ रोजी बडोद्यामध्ये सरदेसाईंच्या इतिहासविषयक कार्याचा गौरव म्हणून त्यांना मानपत्र आणि साडेतीन हजार रु.ची थैली देण्याचा कार्यक्रम झाला. परंतु हे पैसे स्वतः न घेता सरदेसाईंनी त्यांचे पुण्याचे चितळे नावाचे मित्र ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी छापत होते त्या कामाला त्यातील दीड हजार रु. देण्याची विनंती सत्कार समितीला केली.

## पेशवे दप्तराच्या कामाला सयाजीरावांची मदत

सरदेसाई पुण्यात गेल्यानंतर पुढे कामशेत येथे राहू लागले. १९३३ मध्ये त्यांनी मुंबई सरकारच्या आर्थिक सहकार्याने पेशवे दफ्तर संपादनाचे काम ४ वर्षे केले. परंतु शेवटच्या वर्षी मुंबई सरकारने आर्थिक मदत थांबवली. अशा वेळी जदुनाथ सरकारनी त्यांना सयाजीरावांकडे मदत मागण्याची सूचना केली. महाराज

नाराज असल्यामुळे ते मदत करतील का अशी शंका सरदेसाईंना होती. परंतु जदुनाथ सरकारनी आग्रह केल्याने सरदेसाईंनी महाराजांना युरोपात पत्र लिहून ३ हजार रु.ची मदत मागितली. महाराजांनी तत्काळ बडोद्यात दिवाणांना तार करून सरदेसाईंना पेशवे दफ्तराच्या कामासाठी ३ हजार रुपये पाठविण्याचा आदेश दिला. यात सयाजीरावांच्या स्वभावातील उमदेपणा स्पष्ट होतो. सयाजीरावांनी कधीही कुणाचा द्वेष आणि तिरस्कार केला नाही.

सरदेसाईंनी इतिहासाला दिलेले योगदान विचारात घेता त्यांचे मुख्य योगदान मराठ्यांच्या इतिहासाला आहे. आज त्यांच्या लेखनात काही त्रुटी दिसतील परंतु मराठ्यांचा इतिहास अभ्यासताना त्यांची 'मराठा रियासत' वगळून पुढे जाता येत नाही. यासंदर्भात श्री. रा. टिकेकर म्हणतात, "सरदेसायांचे इतिहासकार्य म्हणजे त्यांच्या रियासती. त्यांचा विस्तार व्यापक, म्हणजे सुमारे हजार वर्षांचा इतिहास आहे. त्याची विभागणी मुसलमानी, मराठी व ब्रिटिश अशा तीन प्रमुख रियासतीत झाली असली तरी सरदेसायांचे मुख्य कार्य मराठी रियासतीचे आहे. मुसलमानी व ब्रिटिश या दोन्हींसाठी प्रत्येकी दोन दोन खंड लागले. पण मराठा रियासतींसाठी एकंदर आठ खंड लागले." टिकेकरांच्या या मतावरून मराठ्यांच्या इतिहास लेखनाला सरदेसाईंच्या रूपाने बडोद्याचे असणारे योगदान किती मोठे होते याचा पुरावा मिळतो.

सरदेसाईंनी रियासतमालेचा पाया १८९८ मध्ये घातला. परंतु रियासतकारांच्या मराठा रियासतीत कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याची शाखा राहिली होती याबाबत रियासतकार सरदेसाईंना खंत होती. रियासतकारांचे हे अपूर्ण राहिलेले काम स.मा.गर्गे यांनी पूर्ण करून मराठा इतिहास लेखनाचा सरदेसाईंनी सुरू केलेला प्रवास पूर्ण केला. थोडक्यात इतर सर्व क्षेत्रांप्रमाणे मराठ्यांच्या इतिहास लेखनातील पायाभूत काम इतिहासप्रेमी सयाजीरावांच्या प्रेरणेने सुरू झाले. यासंदर्भात सरदेसाईंनी दिलेली प्रांजळ कबुली सयाजीरावांच्या आश्रयाचे महत्त्व विशद करते. सरदेसाई म्हणतात, "पण पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही या न्यायाने माझा धीर चेपून आता तर मी रियासतकार म्हणून मिरवितो त्याचे श्रेय मुख्यत: त्या महाराजांस आहे." या कामाचा समारोप कोल्हापुरात झाला हा एक सुखद योगायोग आहे.

## सयाजीरावांच्या बदलत्या मानसिकतेचे साक्षीदार

सरदेसाईंनी महाराजांच्या सहवासात आपल्या आयुष्यातला सर्वाधिक काळ घालवला असल्यामुळे महाराजांच्या उमेदीच्या काळापासून ते महाराजांच्या मृत्यूपर्यंतच्या कालखंडातील महाराजांच्या सर्व मनोवस्था त्यांनी जवळून अनुभवल्या होत्या. पहिली पत्नी, दोन मुली आणि चार तरुण मुलांचा झालेला अकाली मृत्यू यासारखे भावनिक आघात, नातेवाईकांचा असणारा नियमित त्रास, केलेले अफाट काम, ब्रिटिश सत्तेशी

२५ वर्षांचा जीवघेणा संघर्ष या सगळ्याचा परिणाम म्हणून बिघडलेले शारीरिक आरोग्य यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेले टोकाचे बदल सरदेसाईंनी अनुभवले होते.

त्या संदर्भात 'सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात' या पुस्तकात सरदेसाई महाराजांचे मनोविश्व कसे बदलत गेले याचे अतिशय बारकाव्याने निरीक्षण नोंदवताना म्हणतात, "तीस-चाळीस वर्षें सयाजीरावांच्या निकट सहवासांत वागलेले माझ्यासारखे माणूस फार थोडे होते. पहिली त्यांची वृत्ती अत्यंत आनंदी, खेळाडू, आरडाओरडा करून सर्वांशी समरस होण्याची होती. आट्यापाट्या खेळताना मी त्यांचा गोंगाट पाहिला आहे. हसायला लागले की दूरपर्यंत सर्वांना आश्चर्य वाटे की, काय प्रकार आहे. १९०८ साली वडील चिरंजीव फत्तेसिंहराव वारले. पुढे दिल्लीचे प्रकरण गाजले. तेव्हापासून महाराजांचे हसणे-खिदळणे सर्व बंद पडून उत्तरोत्तर ते एकलकोंडे बनत गेले. एकदा दिवाळीत टोपल्या भरून लाडू आणले. त्यांनीच चेंडूसारखी मारामार पाचपन्नास लोकांशी चाललेली मी पाहिली आहे. उसाचे गाडे आले, त्यांजवर महाराजांनी गर्दी करून तोंडानेच ऊस खाण्याचा सपाटा इतरांबरोबर चालविला. असे मनमुराद इतरांशी मिसळलेले मी त्यांना पाहिले आहे. याचे उलट पुढे पुढे ते सर्वथा एकटे एकटे असे राहू लागले की, जेवताना वाढणारा सुद्धा जवळ नसावा. एका टेबलावर भोजन ठेवून नोकराने घंटा वाजवावी व आपण बाजूला जावे. घंटा वाजली तरच आत यावे.

इतका त्यांना माणसाचा संसर्ग नकोसा झाला. पाऊणशे ऐंशी वर्षांच्या त्यांच्या हयातीची शेवटची पंचवीस-तीस वर्षे ते असे एकटे वागू लागले. काम, वाचन, उद्योग सर्व चालत, पण जवळ दुसरा माणूस नको. मी बडोद्यास असता रात्री दोन वाजता माझ्या दारात मोटार आली की महाराज बोलावतात. शहराबाहेर पाच मैल मकरपुरा येथे ते राहत होते. मी गेलो. दाराशी ए. डी. सी. बसले होते. ते म्हणाले, "वर जा, महाराज तुम्हास बोलावतात. मला तुमच्याबरोबर जाण्याचा हुकूम नाही." मी त्यांचा माग काढीत जवळ गेलों. पाहाताच मला म्हणाले, 'झोप येईना म्हणून काही गप्पा मारण्यासाठी तुम्हास बोलावले.' तास दीड तास काही तरी वाचून बोलून झाल्यावर त्यांनी मला रजा दिली. पहिली तीस व शेवटची तीस इतक्या वर्षांतला त्यांच्या वृत्तींतील एवढा पालट सहसा इतरत्र आढळत नाहीं."

## सयाजीरावांचे द्रष्टे मूल्यमापन

सयाजीराव आणि सरदेसाई यांचा ऋणानुबंध विचारात घेता सयाजीरावांच्या भारतीय इतिहासातील स्थानाविषयी सरदेसाईंसारख्या इतिहासकाराचे मत महत्त्वाचे ठरते. सरदेसाई भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि प्रबोधन चळवळ या दोन्ही चळवळींचे पितामह सयाजीराव कसे आहेत हे स्पष्ट करताना म्हणतात, "सयाजीराव महाराज एक अलौकिक व्यक्ती भारतभूमीला भूषण आणणारी निर्माण झाली हे लौकिकात आता फार थोड्यांना माहीत आहे. इंग्रजी अमदानीच्या शंभर

वर्षांत उत्कर्षाची पहिली स्फूर्त्ती राष्ट्राला दाखविणारी ही विभूती असून त्यांच्याशी मी जीवनाचे पहिले धडे शिकू शकलो हे मी आपले मोठे भाग्य समजतो. त्यांचीं कित्येक चरित्रे प्रसिद्ध झाली; पण ती अनेक कारणांनी आज तरी लुप्त बनली आहेत. काँग्रेस व महात्मा गांधी यांच्या उद्योगाने भारतभूमीचें विमोचन परचक्रांतून झाले असे आपण समजतो. पण प्रत्यक्ष राज्यात सुधारणा करून उन्नतीचे खरे मार्ग प्रथम कृतीत आणून इंग्रज राजकर्त्यांनाही सयाजीरावांनीं दभवून सोडले. इंग्रजांचा रोष झालेल्या अनेक राष्ट्रसेवकांचा त्यांनीं धैर्याने बचाव केला. सक्तीने शिक्षण व ग्रंथालयाची योजना हिंदुस्थानात प्रथम सयाजीरावांनी निर्माण केली. त १९३९ मध्ये निवर्तले आणि पुढे थोड्याच अवधीनंतर इंग्रजसत्ता संपून आमची देशी संस्थाने इतकी विलीन झाली की, आज दोनशे वर्षें इंग्रजांप्रमाणेच या आपल्या स्वदेशी राजांचा अंमल भारतभूमीवर होता हा इतिहासही आता लुप्त झाला आहे.

माझे तर मुख्य आयुष्य सयाजीरावांच्या निकट परिचयात गेल्यामुळे माझ्या आठवणी अद्यापि ताज्या आहेत आणि त्या गोड व स्मरणीयही आहेत. त्या निमित्तानेच मी हे माझे पहिले आख्यान आज मुद्दाम येथे सांगितले आहे की, त्यावरून वाचकांस पुढील विषयाची कल्पना यावी. भलेपण मिळवायला प्राप्त परिस्थितींत प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रात भरपूर अवकाश आहे.

म्हणूनच सयाजीराव बारा वर्षांचे असता अकल्पित कारणांनी बडोदानरेश बनले. खेडवळ जीवनातून नियतीने त्यांना उचलून एकदम भाग्याच्या परमोच्च शिखरावर आणून बसविले आणि पुढील साठ वर्षांच्या दीर्घ कारभारांत त्यांनी आपले सर्वांगीण कर्तृत्व प्रकट करून जागतिक कीर्ती मिळविली. शिवाजीचा अवतार निराळ्या प्रकारचा झाला. तशाच प्रकारचा भिन्न मार्ग हुडकण्याचे भाग्य सयाजीरावांस लाभले.' रियासतकारांसारख्या मराठ्यांच्या 'आद्य' इतिहासकाराने सयाजीरावांची तुलना थेट शिवरायांशी करणे ही बाब सयाजीराव हे शिवरायांचे 'खरे' वैचारिक वारसदार असल्याची साक्ष देणारी आहे.

सयाजीरावांनी भारताला गुलाम करणाऱ्या महाबलाढ्य ब्रिटिश सत्तेला थेट आव्हान देण्याचे धैर्य दाखवले. सयाजीरावांच्या सामाजिक सुधारणा ब्रिटिश राज्यकर्त्यांना सहन होत नव्हत्या. स्वातंत्र्यलढ्यातील प्रमुख नेत्यांना सयाजीराव पाठबळ देत असतानाही सयाजीरावांना राजद्रोही ठरवण्याइतपत पुरावे ते मागे ठेवत नसल्यामुळे जगावर राज्य करणाऱ्या महाशक्तीचा अहंकार दुखावत होता. परिणामी ज्याप्रमाणे मोगल सैनिकांच्या घोड्यांना संताजी-धनाजी पाण्यात दिसत होते त्याप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यरुपी घोड्याला सयाजीराव छळत होते.

या संदर्भात सरदेसाईंनी नोंदवलेले निरीक्षण पुरेसे बोलके आहे. सरदेसाई म्हणतात, "ब्रिटिशांशी लढणाऱ्या क्रांतिकारकांना मदत करून त्यांचा सयाजीरावांनी धैर्याने बचाव केला, ही हिंदुस्थानातील अनोखी गोष्ट आहे. सयाजीराव महाराजांनी त्यांच्या शाहात्तर वर्षांच्या आपल्या हयातीत एवढे पराक्रम करून दाखविले की, इंग्रजी सत्तेच्या एका शतकात असे दुसरे राजे झाले नाही. बलिष्ठ सार्वभौम सत्तेशी सदैव झगडून आपले कायदेशीर हक्क शिकस्तीने सयाजीरावांनी सांभाळले. समस्त भारतात राजद्रोहाची व खून जाळपोळीची स्फोटक लाट उसळली, तीत अनेकांचा बचाव महाराजांनी धैर्याने केला की जेणकरून हिंदुस्थानास नवीन स्फूर्ती मिळाली."

सयाजीरावांबद्दल सरदेसाईंनी व्यक्त केलेल्या या भावना पुरेशा बोलक्या आहेत. सयाजीरावांसंदर्भात उपलब्ध सर्व मराठी साहित्य विचारात घेता सरदेसाईंच्या भूमिकेशी सुसंगत अशा अनेक तपशिलांचे संदर्भ यामध्ये उपलब्ध आहेत. परंतु दुर्दैवाने आधुनिक महाराष्ट्रावरील इतिहास लेखनात महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाचा पाया घालण्याबरोबरच त्याचा 'पुरोगामी' कळससुद्धा ज्या सयाजीरावांनी बसवला त्यांचा उल्लेखसुद्धा न होणे गंभीर आहे. एकूणच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनावर त्यातून असंख्य प्रश्न उपस्थित होतात.

'ब्राह्मणांनी आमचा इतिहास टाळला' असे म्हणत इतिहास लेखन करणाऱ्यांना तर तोंड दाखवायलाही जागा राहणार नाही असा हा इतिहास आता पुढे येत आहे. दुर्दैवाने बहुजनांच्या बाजूने इतिहास लेखन करणाऱ्या संशोधक-लेखकांची विश्वासार्हता यामध्ये संपणार आहे. हे आपल्या परंपरेला कमीपणा आणणारे आहे. परंतु परंपरा ज्यांच्या खांद्यावर आहे त्यांची दृष्टी जर कोती, आत्मकेंद्री आणि ढोंगी असेल तर असेच होणार. आता मात्र इतिहास लिहीत-सांगत असताना जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे सांगण्याचा बोध यातून घ्यायला हवा.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



### ❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com